## बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २६ | बुधवार,दि.४ जून २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# शासन निर्णयाला हरताळ फासत वनविभागाने काढली बांधकामांची निविदा

## काम वाटपात मजूर सहकारी संस्थेला प्राधान्य देत सुबेअवर केला अन्याय

**गोंदिया:–** जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागात कामवाटपात शासन निर्णयाला बाजूला सारत मोठ्याप्रमाणात अनियमितता केल्याचे अनेक प्रकरण ताजे असतानाच गोंदिया येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्यावतीने विविध ७ कामांकरीता निविदा मागविण्यात आल्या.या निविदा मागवितांना कामवाटपाचे प्रमाण बाजूला सारत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याना डावलून मजूर सहकारी सस्थांवर मेहरबानी दाखविल्याचे बघावयास मिळाले

.गोंदिया उपवनसंरक्षक कार्यालयाच्यावतीने २० मे २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेत ७ कामापैकी १ काम खुल्या कंत्राटदाराकरीता(२९ लाख ४२ हजार १०० रुपये),१ काम सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकरीता(१६लाख०४ हजार ९७२ रुपये) व ५ काम (१३,०७,६९३ रु.,१३,०५,२७४ रु.,१३,०१,३७६रु.,१३,०८,२३२ रु. व १७,४०,६०० रुपये किमतीचे) मजूर सहकारी संस्थाच्या नावे घालून निविदा आमत्रिंत करण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार कामे वाटप करतांना सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था व इतर(खुले)कंत्राटदार यांना अनुक्रमे ३३:३३:३४% या प्रमाणात कामाचे वाटप करायचे आहे.परंतु गोंदिया वनविभागाने प्रसिध्द केलेल्या निविदेत या सर्व बाबीला फाटा दिल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. विशेष म्हणजे मजूर संस्थेला काम देण्याकरीता लोकांच्या मतावर निवडून गेलेले लोकप्रतिनिधी अधिकारी यांच्यावर दबाव आणत असल्याचेही बोलले जात असून कुशल कामांना अकुशल श्रेणीत दाखवून मजूर संस्थाला लाभ पोचविले जात आहे.

जेव्हा शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ११ जून २००७ व मुख्य अभियंता नागपूर यांच्या १० डिसेंबर २०२० च्या पत्रानुसार तसेच शासन परिपत्रक दि.५.२.१९९१ अन्वये मजूर सहकारी संस्थांना वाहतुकीची कामे, नलिका कूप खोदणे, विशेष स्वरुपाची आर.सो.सी. कामे, पेस्ट कंट्रोल अथवा जल प्रतिबंधक कामे आणि हॉट मिक्स प्लांट आणि पेव्हर फिनिशरची कामे देण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु या निर्णयाकडे वनविभाग व बांधकाम विभागाचे प्रमुख स्पष्टपणे डोळेझाक करुन मजुर सहकारी संस्थांना अशाप्रकारची कामे देऊन शासन निर्णयाचा फज्जा उडवित असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यातच गोंदिया वनविभागाने सुध्दा नुकत्याच प्रसिध्द केलेल्या निविदेत या बाबींना बाजूला सारल्याने आणि काम वाटपात सुसुत्रता व प्रमाण बाजुला सारल्याने या सर्व प्रकरणावरच संशय व्यक्त केला जात आहे. मार्गदर्शक सूचनांना अधिकारी–कर्मचाऱ्यांनी पायदळी तुडविल्याने याचा मोठा फटका जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदारांना बसला आहे.

विभागाने आर्थिक हितसंबंध जोपासतात पदाचा गैरवापर करून एका विशिष्ट घटकाला जाणीवपूर्वक फायदा करून देण्याच्या उद्देशाने शासनाच्या नियमांची पायमल्ली करत निविदा प्रक्रिया राबविली आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. ग्रासयो–२०२०/प्र. क्र.७०/ बांधकाम–२ दि.०५–०४–२०२३ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना



उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कार्यालय.
वनभवन टि.पी. टोली कुडवा रोड, गायत्री मंदीर जवळ, गोंदिया दुरध्वनी क्रमांक 07182 (235388) फॅक्स क्रमांक 07182 (237265)
ता. जिल्हा – गोंदिया ई-मेल आयडी- dycfgondia@mahaforest.gov.in

ई – निविदा सुचना क्रमांक - 01/2025 – 2026 (प्रथम वेळ)

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा दिनांक 20.05.2025 पासून पहावयास उपलब्ध आहे.

ई-निविदा कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वनविभाग | वनपरिक्षेत्र | कामाचे नाव | प्रत्यक्ष कामाची किंमत (आकस्मीक रक्कम वगळून) | निविदा फार्मची किंमत + 18% GST रुपये | ईसारा रक्कम रु. 1% | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा प्रवर्ग | निविदा मंजूर झाल्यानंतर करारनाम्या वेळी भरावयाची सुरक्षा रक्कम 2% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Gondia | Tirora | Construction of Residential Quarter Type-II RO (Singal Unit) At. Forest Colony Premises At Tirora C.N.111/2 in Range Tirora | 2942100 | 590 | 29400 | 120 Day | शासकीय नियमानुसार खुला प्रवर्ग | 58842 |
| 2 | Gondia | Navegaon Bandh Depo. | Construction of Women Rest Room (for Laddies Staff) At. Office Premises C.N.1273 Navegaonbandh Depot. | 1604972 | 590 | 16000 | 120 Day | सुशिक्षित बेरोजगार अभियंता | 32099 |
| 3 | Gondia | Arjuni/ Morgaon | Construction of Cement Nalla Bandhara Arjuni 792 PF | 1307693 | 590 | 13100 | 90 Day | मजुर सहकारी संस्था | 26154 |
| 4 | Gondia | Arjuni/ Morgaon | Construction of Cement Nalla Bandhara Ramghat-2 253 RF | 1305274 | 590 | 13100 | 90 Day | मजुर सहकारी संस्था | 26105 |
| 5 | Gondia | Navegaon Bandh | Construction of Cement Nalla Bandhara Kwtha-4 202RF | 1301376 | 590 | 13000 | 90 Day | मजुर सहकारी संस्था | 26028 |
| 6 | Gondia | Navegaon Bandh | Construction of Cement Nalla Bandhara Jabbarkheda 195RF | 1308232 | 590 | 13100 | 90 Day | मजुर सहकारी संस्था | 26165 |
| 7 | Gondia | Arjuni/ Morgaon | Providing and Errecting Fix Knot Fencing ANR Plantation Tadgaon C.N.336 of Beat Arjuni in Range Arjuni/Morgaon | 1740600 | 590 | 17400 | 60 Day | मजुर सहकारी संस्था | 34812 |

- ई-निविदा पध्दतीचा तपशिल -

| | | |
|---|---|---|
| 1) | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक - | 20/05/2025 वेळ सकाळी 09.00 वाजता पासून |
| 2) | ईनिविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | 20/05/2025 वेळ सकाळी 09.00 वाजता पासून |
| 3) | ईनिविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | 03/06/2025 सांयकाळी 5.00 वाजता पर्यंत |
| 4) | ऑनलाईन निविदा उघडणे | दिनांक 04/06/2025 रोजी सांयकाळी 5.30 वाजता लिफाफा क्रमांक 1 (तांत्रीक दस्तावेज) उघडण्यात येईल. अपरिहार्य कारणास्तव निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय निवड समिती, गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कडे राखुन ठेवला आहे. |

(राहुल गवई)
उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग गोंदिया

Scanned with CamScanner

उपजीविकेचे साधन म्हणून विविध सवलती देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार, मजूर सहकारी संस्था व इतर कंत्राटदार यांना अनुक्रमे ३३:३३:३४% असे प्रमाण काम वाटपासाठी आरक्षित केलेले आहे. असे असताना देखील वनविभाग गोंदियाने निविदा प्रक्रिया राबवताना एका विशिष्ट गटाला फायदा करून देण्यासाठी शासनाकडून देण्यात आलेले आरक्षण प्रमाण डावलून मजूर सहकारी संस्थाना ७०% कामाच्या ई–निविदा काढलेल्या आहेत. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदारांवर अन्याय तर केला जात आहेच परंतु एका विशिष्ट गटाला फायदा करून देण्यासाठी पदाचा गैरवापर देखील केलेला दिसून येत आहे.

मर्जीतील ठेकेदारांना फायदा करून देण्याच्या उद्देशाने काम वाटप झाल्याने भविष्यात त्या ठेकेदारांकडून केलेल्या कामांचा दर्जा काय स्वरूपाचा असतो हे जिल्ह्यातील जनता सद्यस्थितीत दररोज अनुभवत आहेत. सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटना याबाबत मागील अनेक दिवसांपासून अधिकारी वर्गाकडे न्याय मागत असतानासुद्धा त्यांचेकडून फक्त बघ्याची भूमिका घेण्यात आली.

यामागे नेमके काय “गौडबंगाल” आहे हा देखील संशोधनाचा विषय आहे. विशेष म्हणजे मजूर संस्थेला काम देण्याकरीता लोकांच्या मतावर निवडून गेलेले लोकप्रतिनिधी अधिकारी यांच्यावर दबाव आणत असल्याचेही बोलले जात असून कुशल कामांना अकुशल श्रेणीत दाखवून मजूर संस्थाला लाभ पोचविले जात आहे. त्यातच सध्या गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूका असून या निवडणूकीत सुध्दा मजूर सहकारी संघाची महत्वाची भूमिका असल्याने सर्वच पक्षातील आजी माजी लोकप्रतिनिधी मताकरीता गप्प बसल्याचेही दिसून येत आहे.

वनविभागात जी कामे केली जात आहेत,त्या संदर्भात शासन निर्णयानुसार वाटप करण्याची प्रकिया आणि शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात व जी कामे मजूर सहकारी संस्थांना देण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश आहेत,त्या कामासंदर्भात गोंदिया वनविभाग कार्यालयात ८ महिन्यापुर्वी माहिती अधिकारी अंतर्गत माहिती मागविण्यात आलेली माहिती अपिलानंतरही विभागाने माहिती न देता टाळाटाळ केल्याची माहिती अर्जदार सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटनेचे सचिव महेश अग्रवाल यांनी दिली आहे.

### सर्व शिक्षा अभियानातील ६ कोटीच्या काम वाटपातही घोळ

गोंदिया जिल्हा परिषदेतंर्गत येत असलेल्या समग्र शिक्षा अभियानाच्यावतीने सुमारे ६ कोटी रुपयाची कामांची निविदा आमंत्रित करण्यात आली.यामध्ये सुध्दा शासनाच्या निर्णयाला हरताळ फासण्यात आले आहे.सालेकसा,गोंदिया,सडक अर्जुनी,तिरोडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामध्ये संगणक संच,शैक्षणिक साहित्य आदी कामाकरीता हि निविदा काढतांना सुध्दा मजुर सहकारी संस्थानाच प्राधान्य देण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांना डावलत आजी माजी आमदारांना उमेदवारी

**गोंदिया:–** विविध कारणांनी रखडत अखेर तब्बल १३ वर्षांनंतर होणाऱ्या गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी निवडणुकीत १६३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत . निवडणुकीत अर्जुनी मोरगावचे विद्यमान आमदार राजकुमार बडोले व तिरोड्याचे आमदार विजय रहांगडाले हे देखील रिंगणात आहेत, गेल्या २० वर्षांपासून या बँकेचे अध्यक्ष असलेले माजी आमदार राजेंद्र जैन पुन्हा रिंगणात आहेत.तिरोड्याचे माजी आमदार दिलीप बनसोड, आमगावचे माजी आमदार भेरसिंग नागपुरे, माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांचे पुत्र प्रफुल्ल अग्रवाल, विशाल अग्रवाल हेही या निवडणुकीत रिंगणात आहेत.आमदारांनी स्वतःच रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याने दबक्या आवाजात सर्वच पक्षातील कार्यकर्ते नाराजी व्यक्त करीत असल्याचे दिसून आले.

शिवसेनेचे गोंदिया जिल्हाप्रमुख मुकेश शिवहरे हेही भाजप–राष्ट्रवादीने सोबत युतीत सहभागी न केल्यामुळे शिवसेना (शिंदे गट) वेगळे ठेवण्यासाठी रिंगणात आहेत. उद्धव शिवसेनेचे गोंदिया जिल्हाप्रमुख पंकज यादव, बँकेचे माजी संचालक राजकुमार कुथे, अशोक (गप्पू) गुप्ता हेही उमेदवार आहेत. या दिग्गज नेत्यांसह बँकेचे मावळते सचिव अविनाश जैस्वाल, उपाध्यक्ष राधेलाल पटले, रेखलाल टेंभेरे, विजय राणे, केतन तुरकर,भावना कदम, प्रिया हरिणखेडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई मेंढे, सुभाष आकरे, प्रमोद संगीडवार, माजी





जिल्हा परिषद उपाध्यक्ष रचना गहाणे यांच्यासह १६३ उमेदवार रिंगणात आहेत यांनी नामांकन दाखल केले आहे.

मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इतिहासात काँग्रेसची भुमिका महत्वाची राहिली आहे. या बँकेवर अनेक वर्ष काँग्रेसचा ताबा राहिला आहे. मात्र गेल्या २० वर्षाच्या सत्तेतही काँग्रेसचा वाटा राहिला आहे, मात्र या निवडणुकीत राज्यातील बदलत्या राजकारणाचा परिणाम पहावयास मिळू लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीसाठी भाजपशी मित्रता करून सहकार पॅनलची स्थापना केली आहे. तर दुसरीकडे काँग्रेस पक्ष या निवडणुकीला घेवून एकाकी पडल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसच्या मित्र पक्षाची भुमिका देखील काही महत्वाची दिसून येत नसल्याने सर्व गटातून उमेदवारांची निवड करणे, पुढाऱ्यासाठी एक आवाहन झाले आहे.

### बंडखोरी टाळण्यासाठी सावध पवित्रा

सहकार आणि परिवर्तन हे दोन पॅनल निवडणूक रिंगणात राहणार, हे निश्चित झाले आहे. सहकार पॅनलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप या दोन महायुतीतील घटक पक्षांचा समावेश आहे. तर परिवर्तन पॅनलमध्ये काँग्रेससह इतर मित्र पक्षाचा समावेश आहे. सहकार पॅनलमध्ये अनेक गटामध्ये एकापेक्षा अधिक उमेदवारांनी दावेदारी केल्यामुळे उमेदवार नाव निश्चितीसाठी पुढाऱ्यांकडून सावध पवित्रा घेतला जात आहे.

### मतदारसंघनिहाय नामांकनाची संख्या

| | |
|---|---|
| वैयात्तीक व इतर संस्था जिल्हास्तर – | ०८ |
| अनु. जाती/जमाती प्रतिनिधी जिल्हास्तर – | १५ |
| पगारदार व नागरी सह. पतसंस्था जिल्हास्तर – | ०४ |
| महिला राखीव प्रतिनिधी जिल्हास्तर – | १५ |
| दुग्ध उत्पादक सह. संस्था जिल्हास्तर – | ०५ |
| इतर मागासवर्ग प्रतिनिधी जिल्हास्तर – | २० |
| मजूर कामगार सहकारी संस्था जिल्हास्तर – | ०४ |
| वि.भ.जा/जमा./इमाप्र जिल्हास्तर – | १० |
| विणकर बलुतेदार औद्योगिक जिल्हास्तर – | ११ |
| खरेदी–विक्री व जंगल कामगार जिल्हास्तर– | ०३ |
| मत्स्य सहकारी संस्था जिल्हास्तर – | ०८ |

### विविध कार्यकारी संस्था तालुकानिहाय

आमगाव – १०, गोंदिया – ०८, सालेकसा ०६, सडक अर्जुनी – ०७, देवरी – ०४. अर्जुनी मोरगाव ०७, तिरोडा–०८ व गोरेगाव – १०.

### संघ निहाय मतदार सख्या

| | |
|---|---|
| खरेदी–विक्री, ग्राहक, भात गिरणी व जंगल कामगार सहकारी संस्था संघ– | ४७ मतदार |
| दूग्ध उत्पादन सहकारी संस्था मतदार संघ – | २७ मतदार |
| पगारदार व नागरी सहकारी पत संस्था – | १२२ मतदार |
| मजूर कामगार सहकारी संस्था – | ६९ मतदार |
| मत्स्य पालन सहकारी संस्था – | ७७ मतदार |
| वैयक्तीक व इतर संस्था मतदार संघ – | १४३ मतदार |
| विनकर व बलुतेदार सह. संस्था – | ८३ मतदार |

### विविध कार्यकारी सहकारी संस्था संघ

| | |
|---|---|
| तिरोडा– | ६६ मतदार |
| सालेकसा – | २४ मतदार |
| सडक अर्जुनी– | २५ मतदार |
| गोंदिया– | ६२ मतदार |
| देवरी – | १६ मतदार |
| गोरेगाव – | ५० मतदार |
| आमगाव | ४७ मतदार |
| अर्जुनी मोरगाव – | ३६ मतदार |








कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्था, देवरी द्वारा संचालित
**छत्रपती शिवाजी ज्यु.कॉलेज ऑफ एज्युकेशन, देवरी ता.देवरी, जि.गोंदिया**
एन.सी.टी.ई.भोपाल व महाराष्ट्र शासनद्वारा मान्यता प्राप्त

**व्यवस्थापन कोटा**

डी.एल.एड.प्रवेश सुचना २०२५–२६

कायम विना अनुदानित मराठी माध्यम डी.एल.एड.प्रथम वर्ष २०२५–२६ व्यवस्थापनकोट्यातील १० जागा करिता प्रवेश शुरु आहे.

| SC | ST | NJNT | OBC/SBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | 01 | 02 | 05 | 10 |

अर्ज विक्री व स्विकृती :दि.५/६/२०२५ ते १०/६/२०२५ (सुट्टीचे दिवस धरुन)
गुणवत्ता यादी जाहीर करणे: १०/६/२०२५
आवेदन अर्जाची किंमत खुला प्रवर्ग :२००/– रुपये, मागासवर्गीय–१००/– रुपये इयत्ता १२ वी मध्ये खुल्या प्रवर्गासाठी ४९.५० टक्के गुण व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४४.५० टक्के गुण आवश्यक.
संपर्क: 7447885145,9545443325

सचिव — कृ.सह.तंत्र शिक्षण संस्था देवरी, जि.गोंदिया
प्राचार्य — छत्रपती शिवाजी ज्यु.कॉ.ऑ.एज्युकेशन देवरी, जि.गोंदिया



## संपादकीय

### प्रत्येकाला समाजभान असणे आवश्यक

काही व्यक्ती मिळून कुटुंब बनते आणि अनेक कुटुंबांचा समाज बनतो.समाज हा लोकांचा एक समूह आहे जो एकमेकांना जीवन जगण्यात आणि त्याची परिस्थिती सुधारण्यासाठी,मदत करण्यासाठी एकत्र राहतो.व्यक्ती म्हणून जसे आपले काही वैयक्तिक कर्तव्य आपण पार पाडत असतो, तसेच समाज (समूह) म्हणून सुद्धा आपली प्रत्येकाची काही कर्तव्ये असतात.ती पार पाडलीच पाहिजे असे जरी आपल्यावर बंधन नसले तरी माणुसकी,मानवता,मानवधर्म म्हणून ती कर्तव्ये पार पाडणे एक समाज घटक म्हणून आपली जबाबदारी असते व ती जबाबदारी पार पाडण्याचा जर प्रत्येकाने प्रयत्न केला तर समाजात घडणाऱ्या बऱ्याच दुःखद, वाईट, घृणास्पद, वेदनादायी घटना आपण थांबवू शकतो. प्रत्येक वेळी जर आपण सरकारकडे बोट दाखवत असू आणि सरकार काहीतरी निर्णय घेईल म्हणून वाट बघत असू तर अजूनही आपण स्वतःला समाजाचे घटक समजत नाही आणि आपल्याला अजूनही समाजभान आलेले नाही असे म्हटले तरी काही वावगे होणार नाही.

आपल्या अवतीभोवती समाजामध्ये दररोज काही ना काही अप्रिय घटना घडत असतात.त्या कोणत्या ना कोणत्या माध्यमातून आपल्या कानापर्यंत पोहोचतात. वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल, सोशल मीडिया, लोकांची चर्चा यामधून देश, राज्य, आपला परिसर या सर्व ठिकाणी मन हेलावून टाकणाऱ्या अनेक धक्कादायक घटना आपल्या कानावर पडतात.या घटना आपल्यासारख्याच कोण्या तरी व्यक्तीच्या कुटुंबात घडलेल्या असतात.त्या घटनेमुळे त्या कुटुंबावर खूप मोठा आघात झालेला असतो व ते कुटुंब दुःखाने होरपळून निघालेले असते. अशावेळी त्या कुटुंबाला मानसिक आधाराची नितांत आवश्यकता असते. हा आधार त्यांचे नातेवाईक किंवा जवळच्या मित्रांकडून मिळत असतो. परंतु समाज म्हणून आपली सुद्धा काही जबाबदारी असते.आपण प्रत्यक्ष त्या कुटुंबाला भेटू शकत नाही किंवा त्यांना मदत करू शकत नाही,परंतु घटना कितीही लांब जरी घडलेली असली तरी त्या घटनेच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया मात्र आपण नक्कीच देऊ शकतो.प्रत्येकच घटनेवर आपण प्रतिक्रिया देऊ शकत नाही परंतु बलात्काराच्या घटना,वैष्णवी हगवणे सारख्या मन सुन्न करणाऱ्या घटना, कित्येक स्त्रियांना जाळून टाकण्याच्या घटना,संतोष देशमुख सारख्या अमानुषपणे हत्या करण्याच्या घटना,राजकीय नेत्यांच्या लज्जास्पद कृती, सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचे भ्रष्टाचार किंवा घृणास्पद कृत्य अशा बऱ्याच प्रकारच्या अतिशय निंदनीय आणि समाजमन हादरवून टाकणाऱ्या घटना आपल्या अवतीभोवती नेहमी घडत असतात.

अशावेळी आपण काहीतरी भूमिका घेणे फार महत्त्वाचे असते.कारण ही भूमिका घेतल्यानंतर अन्याय करणाऱ्याच्या विरोधात जनमत तयार होते.सरकार ॲक्शन मोडवर येते आणि जनमताच्या दबावामुळे सरकारला अन्यायी, गुन्हेगार व्यक्तीवर कारवाई करावी लागते.लोकांचा दबाव जर नसला तर अनेकदा कारवाई होत नाही कारण काही गुन्हेगारांचे राजकीय संबंध किंवा पैशामुळे फार मोठे दबाव तंत्र असते.त्यामुळे पोलीस त्यांच्यावर कारवाई करत नाही.परंतु समाजाने जर उठाव केला,निषेध व्यक्त केला, निवेदने दिली,मोर्चे काढले, आंदोलन केले तर निश्चितपणे समाजमन ढवळून निघते आणि त्या पीडित कुटुंबाला सुद्धा आपल्या पाठीशी कोणीतरी आहे असे वाटते आणि आपण आता आपल्यावर अन्याय करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात ताकतीने लढू शकतो अशी हिम्मत निर्माण होते. म्हणून समाज किंवा समूहाची ताकद ही वैयक्तिक ताकदीपेक्षा खूप जास्त असते.त्यामुळे समाज घटक म्हणून अशा वाईट घटनेबद्दल देशाचे जागृत नागरिक म्हणून आपले मत व्यक्त करणे,आपली प्रतिक्रिया देणे, त्याबद्दल लिखाण करणे,मुलाखत देणे, काही सामाजिक संघटना निवेदन किंवा आंदोलन करत असतील तर त्यांच्यासोबत सहभागी होणे व आपणही या वाईट कृत्याच्या विरोधात आहोत असे जाहीरपणे जर दाखवले तर निश्चितच एक चांगला समाज निर्माण होण्यासाठी आपली प्रत्येकाची मदत होऊ शकते. समाजाला लज्जीत करणाऱ्या घटनांवर जर आपण कोणतीही भूमिका न घेता चुपचाप बसलो तर ते जिवंतपणाचे लक्षण नाही. शरीराने जरी आपण जिवंत असलो तरी वैचारिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या मात्र आपण मृत आहोत असा त्याचा अर्थ होतो.

सामाजिक भान असलेल्या समाजाची ताकद प्रचंड असते. समाजाच्या आवाजात दम असतो. अन्यायी, अत्याचारी, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या विरोधात जर सामूहिकदृष्ट्या आवाज उठवल्या गेला तर निश्चितपणे आपण गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालू शकतो व आपल्या प्रत्येकावर कधी ना कधी येणाऱ्या संकटाला थोडेफार का होईना निश्चितपणे रोखू शकतो. त्यामुळे आपल्या कुटुंबावर संकट किंवा वाईट प्रसंग येईपर्यंत वाट न बघता, ज्याच्यावर संकट आले आहे तो व्यक्ती जरी आपल्या परिचयाचा नसला तरी एक समाज घटक म्हणून आपण जागृत नागरिक या नात्याने सामूहिक भूमिका घेतली पाहिजे. संकट प्रत्येकाच्या दारापर्यंत येऊन ठेपलेले आहे.अशा भीषण आणि भयानक परिस्थितीमध्ये सामुदायिक भूमिका घेण्याची प्रत्येकाला नितांत आवश्यकता आहे.तरच आपण समाजात दररोज घडणाऱ्या अत्यंत दुःखद आणि वेदनादायी घटना काही प्रमाणात थांबवू शकतो.

**प्रेमकुमार बोके**,अंजनगाव सुर्जी

# साप चावा घेतला नंतर मांत्रिक कडे न जाता डॉक्टरांकडे जाण्यावर लक्ष द्या-डॉ. नितीन वानखेडे



**गोंदिया :-** पावसाळा (Monsoon) येताच साप चावण्याचे प्रकार देखील वाढतात. पावसाळा सुरू होताच काही सापांच्या प्रजननाचा काळ सुरू होतो. तर, मुसळधार पावसामुळं सापांच्या बिळात पाणी साचते. त्यामुळं पावसाळ्यात साप बिळातून बाहेर पडतात व राहण्यासाठी जागेचा आडोसा शोधतात. सुरक्षित जागेच्या शोधात अनेकदा साप घरातील अडगळीच्या खोलीत किंवा घराजवळच्या एखाद्या ठिकाणी आसरा शोधतात. अशावेळी अनावधनाने आपण तिथे जातो आणि साप डसतो.

सर्पदंश झाल्यानंतर अनेक जण घाबरुन जातात. गावाकडे अजूनही साप चावल्यानंतर एखाद्या बुवा-बाबाकडे किंवा मांत्रिकाकडे विष उतरवण्यासाठी नेण्यात येते. मात्र, या प्रकारामुळं एखाद्या व्यक्तीचा जीवदेखील जाऊ शकतो. साप चावा घेतला नंतर मांत्रिक कडे न जाता वैज्ञानिक तांत्रिक डॉक्टरांकडे जाण्यावर लक्ष देण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

**सर्पदंश म्हणजे काय -**

सर्पदंश ही सापांची इतर प्राण्यांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीची संरक्षक यंत्रणा आहे विषारी साप चावण्याला सर्पदंश म्हणतात. याचा मज्जा संस्था, हृदय किंवा रक्त उत्पादक अवयवांवर परिणाम होऊ शकतो. जे वेळेत उपचार न केल्यास प्राण घातक ठरू शकते.

याची मुख्य चिन्हे आणि लक्षणे काय आहेत

जखमीच्या जागेवर दाताचे ठसे दिसतात.

जखमेतून रक्त येते.

सूज चाव्याच्या जागेवर किंवा अवयावर सूज येते.

प्रभावित जागेच्या रंगात फरक दिसतो.

चक्कर येतात.

खूप घाम येतो.

हृदयाची ठोके वाढतात.

वाढलेली हृदयाची गती.

**सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार कसा कराल**

सर्पदंश झाल्यावर तत्काळ वैद्यकीय मदत मिळणे शक्य नसते व ती मिळण्यापूर्वी केलेले उपचार म्हणजेच प्रथमोपचार होय. आतापर्यंत ब-याच सर्पदंशाच्या प्रकरणांत या प्रथमोपचारामुळेच किती तरी लोकांचे प्राण वाचलेले आहेत.त्यामुळे डॉक्टरांपर्यंत पोहोचेपर्यंत हा उपचार अत्यंत महत्त्वाचा आहे, तो कसा कराल?

**सर्पदंश झालेल्या व्यक्तीला धीर द्यावा.**

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला सर्वप्रथम जमिनीवर झोपवावे. कारण जर तो व्यक्ती चालत-फिरत असेल तर विष शरीरात लवकर पसरते.

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला घाबरवू नका त्याला हिंमत द्या. कारण घाबरल्यानंतर रक्तप्रवाह वाढतो अशाने शरिरात विष लवकर पसरते.

पायी चालणे, जास्त बोलणे टाळावे.

विषारी साप हाताला चावला असेल तर दंडाला दोरीने हलकेसे बांधावे जोरात आवळून नाही.

ज्या व्यक्तीला सापाने दंश केला आहे त्याला घाबरवण्यापेक्षा शांत करण्याचा प्रयत्न करावा कारण घाबरल्यामुळे रक्ताभिसरण वेगाने होऊन विष संपूर्ण शरीरात पसरते.

शरीराचा जो भाग सापाने चावला आहे तो भाग हृदयाच्या खाली ठेवण्याचा प्रयत्न करा आणि अजिबात हालचाल करण्याचा प्रयत्न करू नका.

विषारी साप पायाला चावला असेल तर मांडीला दोरीने हलकेसे बांधावे जोरात आवळून नाही.

आवळपट्टी बांधताना दंड व दोरीच्या मध्ये पेन, काडी किंवा बोट चाकून बांधावे बांधल्यानंतर ते बाहेर काढावे.

दर १५ ते २० मिनिटांनंतर बंद १५ सेकंदांसाठी सोडावा व पुन्हा त्याच पद्धतीने बांधावा.

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला चहा, कॉफी किंवा दारू पाजू नये.

दंश झालेल्या जागेवर चिरा किंवा काप घेऊ नये त्यामुळे जास्तीचा रक्तस्राव होऊन व्यक्ती दगावण्याची शक्यता असते.

साप चावलेल्या व्यक्तीच्या हातावर किंवा पायावर बांधलेली कोणतीही वस्तू, जसे की घड्याळ, बांगडी, पायल, ब्रेसलेट किंवा पायल काढा. साधारणपणे साप चावल्यावर सूज येते, त्यानंतर या गोष्टी काढणे कठीण होते.

दवाखान्यात जातांना शक्यतो फोनवर डॉक्टरांना कळवावे जेणेकरून त्यांना तत्काळ मदत करता येईल. १०८/१०२ वर आपत्कालीन अँबुलन्स वाहन वर मदत घ्या.दंश झालेल्या व्यक्तीला दमा किंवा अ?ॅलर्जी अथवा एकादा आजार असल्यास डॉक्टरांना कळवावे.

# २.१९ लाख हेक्टरवर खरिपात पेरणी

### ५१७६१ क्विंटल बियाण्यांची मागणी

**शेतकरी खरीप हंगामासाठी शेतीची मशागत करून ठेवण्यात मग्न आहेत. नांगरणी, काडीकचरा वेचणी, काटेरी झुडपे तोडणे आदी कामे केली जात आहेत. जिल्ह्यात खरीप हंगामात जवळपास २ लाख १९ हजार ३३२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यासाठी कृषी विभागाने ५१ हजार ७६८ क्विंटल बियाणांची मागणी कृषी आयुक्तालयाकडे केली आहे. उन्हामुळे सकाळ व सायंकाळच्या वेळी शेतकरी शेतात काम करीत असल्याचे दिसून येत आहेत.**

**गोंदिया:-** अवकाळी पावसाचा जोर ओसरला. मात्र १५ दिवसांपर्यंत झालेल्या पावसामुळे जमिनीत ओलावा आहे. परिणामी शेतकऱ्यांनी नांगरणीला सुरुवात केली आहे. खरीप हंगामपूर्वी साहित्याची जुळवाजुळव करण्याकामी शेतकरी लागले असल्याचे दिसून येत आहे. यंदा जिल्ह्यात विविध पिकाखाली असलेल्या २ लाख १९ हजार ३३२ हेक्टर क्षेत्रात विविध पिकांची लागवड करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रमुख पीक असलेल्या धानाची २.१३ लाख हेक्टरवर लागवड होणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.



खरीप हंगाम अवघ्या १५ दिवसांवर येवून ठेपला आहे. कृषी विभागाकडून खरीप हंगामपूर्व तयारी सुरू झाली आहे. यंदाच्या हंगामासाठी कृषी विभागाने शासनाकडे ९७ हजार ३५३ मेट्रिक टन रासायनिक खताची मागणी नोंदविली आहे. खरिपासाठी जिल्ह्यातील शेतकरी आता शेतात घाम गाळताना दिसून येत आहे. जिल्ह्यात आगामी खरीप हंगामात २ लाख १३ हजार ७६० हेक्टर क्षेत्रात भात, ५ हजार २१२ हेक्टर क्षेत्रात तूर यासह अन्य मूग, उडीद ऊँचा आदी पीक घेण्याचे प्रस्तावित आहे. दरवर्षी मृग नक्षत्राला सुरुवात होताच शेतकऱ्यांकडून खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला सुरुवात होते. गतवर्षीच्या तुलनेत यंदा चांगला पाऊस पडेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून पेरणीपूर्वीच रासायनिक खताच्या खरेदीचे नियोजन केले

जाते. ही बाब लक्षात घेऊन कृषी विभागाकडून मार्चपूर्वीच खतांच्या मागणीचा आढावा घेत खरीप हंगामासाठी रासायनिक खते, कीटकनाशके आणि बियाण्यांची मागणी कृषी आयुक्तालयास कळिवली आहे. त्यानुसार कृषी विभागाने २०२५-२६ खरीप हंगामासाठी ९७ हजार ३५३ मे. टन रासायनिक खताची मागणी नोंदविली आहे. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी सरासरी २७ हजार ३५३ मे. टन. रासायनिक खताचा वापर केला जातो. कृषी विभागाने त्यानुसार २७ हजार ३५३ मे. टन रासायनिक खताची मागणी कृषी आयुक्तालयाकडे नोंद केली आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी खताची मागणी नोंदवली असली तरी गतवर्षीच्या कोट्यातील २९ हजार ७८ मे. टन खत शिल्लक आहे. यात युरिया २०१९ मे. टन., डी.ए.पी. ५०० मे. टन., एमओपी १६३ मे. टन., एस.एस.पी.८२७६ मे. टन., संयुक्त खते ११०२९ मे. टन खतांचा समावेश आहे.

# आढावा बैठकीत केले खासदारांनी समस्यांचे निराकरण



**आमगाव :-** येथील तहसील कार्यालयात खासदार आपल्या दारी याअंतर्गत सोमवारी (दि. २) आढावा बैठक खा. डॉ. नामदेव किरसान यांच्या उपस्थित पार पडली. या बैठकीत खा. किरसान यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्याचे निराकरण केले.

बैठकीला तहसीलदार मोनिका कांबळे, नायब तहसीलदार सतीश वेलादी, जि. प. सदस्य छबू उके, पोलिस निरीक्षक राणे उपस्थित होते. यावेळी जलजीवन, बोअरवेल दुरुस्ती, कुंभारटोली स्मशानात रोड, बोअरवेलकरिता वन विभागाची परवानगी मिळावी, रेल्वे गेटजवळील विद्युत खांब हटविण्यात यावे, अशी सूचना सुनंदा येरणे यांनी केली. तसेच क्रीडांगण, रोड रस्ते आदी समस्या नागरिकांनी मांडल्या. त्यांचे खा. किरसान यांनी वेळीच निराकरण केले. बैठकीचे संचालन अंसूल हिरकणे यांनी आभार भोयर मानले.

यावेळी सहायक महसूल अधिकारी पी. सी. बावणे, संगीता मानापुरे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय बहेकार, रामेश्वर श्यामकुवर, शंकर रहांगडाले, पत्रकार इशुलाल भालेकर, वाय. सी. भोयर, महिलाध्यक्षा उपराडे, जीवन बहेकार, रितेश चुटे, नरेंद्र बोहरे, राहुल चुटे, महेश उके आदी उपस्थित होते.

## बालकामगार व वेठबिगार कामगार पध्दत निर्मुलनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन- निवासी उपजिल्हाधिकारी बेहेरे




**गोंदिया:-** १८ वर्षाखालील बालकांना धोकादायक उद्योगात तसेच १४ वर्षाखालील बालकांना धोकादायक व बिगर धोकादायक उद्योगांध्ये कामावर लावणे शासकीय गुन्हा आहे. तसेच एखादया व्यक्तीचे इच्छेविरुद्ध वेठबिगारी पध्दतीने काम करण्यास प्रवृत्त करणे हा वेठबिगार कामगार निर्मुलन अंतर्गत गुन्हा आहे. बालकामगार व वेठबिगार कामगार पध्दत गोंदिया जिल्हयातून नाहीसे करणेबाबत विविध शासकीय विभाग, सामाजिक संघटना व नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी, गोंदिया भैयासाहेब रामराव बेहेरे यांनी केले आहे,



जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे गुरुवार दिनांक २९ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय वेठबिगार दक्षता समिती व बाल कामगार कृती दल यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सभेला सहायक कामगार आयुक्त, गोंदिया, राजदीप मो. धुर्वे, कोश ऊ्री. नंदिनी चानपुरकर, प्रतिनिधी महिला व बालविकास विभाग गोंदिया रविंद्र टेंभूर्ण, समन्वयक खडथड गोंदिया दिपमाला भालेराव, तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी व अशासकीय प्रतिनिधी उपस्थित होते.

## प्रोग्रेसिव्ह इंग्लिश हायस्कूलने केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**गोंदिया :-** प्रोग्रेसिव्ह इंग्लिश हायस्कूलच्यावतीने इयत्ता दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थाध्यक्ष डॉ. पंकज कटकवार, उपाध्यक्ष अलका कटकवार, सचिव डॉ. नीरज कटकवार, लीना कटकवार, ज्योती पहिरे, प्राचार्य ओ. टी. रहांगडाले, कुमुदिनी तवाडे, वाय. आशा राव, कुलदीप भौतिक, मीनाक्षी महापात्रा, सुशीला भोयर, दुर्गा रामटेककर उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्ह्यात द्वितीय व शाळेत प्रथम रिंकू एच. सिंगनजुडे, द्वितीय अनुष्का कटरे, तृतीय तुलसी रहांगडाले यांच्यासह श्रवण ब्राह्मणकर, इशांत शिवहरे, मृण्मयी वाकडे, रिचा पारधी, वैष्णवी पटले, नूपुर कापसे, आर्या निनावे, रविता जुरेल, करिना साधवानी, जय वाधवानी, मुस्कान सोनवाने, ओम तांडेकर, इशिता चौहान, चैताली मोरघडे, दिव्या थेर, श्रेयांश चाचरे, वीर पटले, संकल्प कोतवाल, मेरीना ऑगस्टीन, पार्थ पटले, वैष्णवी बारबुद्धे, मयंक बारपांडे, ऋतुजा पवार, योग रहांगडाले, अंश सुमन, कातीके सिरसाम, अंशुल टेंभरे, माही नागबंशी, आरोही नायर, निकिशा गढ़लानी, देवांशू महारवाडे, हर्षा पंधरे, विराज रामटेके, ड्रियांशू अंबुले, प्रतीक मुनेश्वर, धुर्व कावळे, प्राणम्या कोरे, रोहित राऊत यांचा स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आला.

# मे महिन्यातील पावसाने ५५० हेक्टरमधील पिकांचे नुकसान

**गोंदिया :-** जिल्ह्यात मे महिन्यात तीन-चार वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने ५५० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याची बाब कृषी विभागाच्या प्राथमिक सर्वेक्षणातून पुढे आली आहे. तर याचा अंतिम अहवाल तयार व्हायचा असून, या नुकसानीच्या आकड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात रब्बी हंगामात ४६ हजार हेक्टरवर धान, तर ४ हजार हेक्टरवर मका मकाची लागवड करण्यात आली. भाजीपाल्याची सुध्दा तीन ते चार हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली होती. मात्र यंदा एप्रिल आणि मे महिन्यात पावसाने तीन-चार वेळा हजेरी लावली. ऐन धानाची कापणी, मळणी सुरू असतानाच पावसाने हजेरी लावल्याने मोठ्या प्रमाणात धान आणि मका पिकाचे नुकसान झाले. परिणामी तोंडचा घास हिरावला गेल्याने शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे.



### दोन तालुक्यांत सर्वाधिक नुकसान

**मे महिन्यात झालेल्या पावसामुळे सर्वाधिक नुकसान हे सडक अर्जुनी आणि गोंदिया तालुक्यात झाले आहे. या तालुक्यातील नुकसानीचा आकडा अद्याप पंचनाम्यांचा अहवाल तयार झाला नसल्याने पुढे आला नाही. नजर अंदाज सर्वेक्षणात शेकडो हेक्टरमधील रब्बी पिकाचे नुकसान झाल्याची माहिती आहे.**

जिल्ह्यात १ ते ५ मेदरम्यान झालेल्या पावसामुळे ५५ गावांतील १४२ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याने ४४३ शेतकरी बाधित झाले. तर २० ते २५ मेदरम्यान झालेल्या पावसाने ३७१.७१ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याने ८१९ शेतकरी बाधित झाले. पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे कृषी विभागाच्या माध्यमातून करण्यात आले. या पंचनाम्यांचा अंतिम अहवाल तयार करण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. ते पूर्ण झाल्यानंतर हा अहवाल शासनाकडे पाठविला जाणार असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# आमदारांनी केली बांधकामाची पाहणी



**अर्जुनी मोरगाव:**-सानगडी-नवेगाव-गोठणगाव-केशोरी-इळदा मार्गावरील रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणाचे महत्त्वाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या विकासकामांची सखोल पाहणी सोमवारी (दि.२) माजी मंत्री व स्थानिक आ. राजकुमार बडोले यांनी स्वतः करून कामाची गुणवत्ता व प्रगती तपासली.

यावेळी आ. बडोले यांनी ठेकेदार व विभागीय अधिकाऱ्यांशी संवाद साधून कामात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. गावोगावचे रस्ते सक्षम आणि टिकाऊ झाले पाहिजेत, हेच आमचे ध्येय आहे. विकासकामात गुणवत्ता हीच आमची ओळख आहे, असे ठाम मत व्यक्त केले.

या दौऱ्यात माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सदस्य यशवंत गणवीर, तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, माजी जि. प. सदस्य किशोर तरोणे, पवनी/धाबे उपसरपंच पराग कापगते, चेतन नाकाडे यांच्यासह इतर स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रस्त्याच्या कामामुळे परिसरातील गावांना सशक्त दळणवळण सुविधा मिळणार असून, आर्थिक व सामाजिक प्रगतीस चालना मिळणार आहे. आ. बडोले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे महत्त्वाचे काम वेगात पूर्णत्वाकडे जात आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

## जि.प.बदल्यामध्ये पारदर्शकता? बदलीची फाईल सांभाळणारा १० वर्षापासून ठाण मांडून

# महिला कर्मचाऱ्यावर अन्याय,पती पत्नी एकत्रीकरणाचा फज्जा

**गोंदियाः-** गोंदिया जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या पारदर्शकपणे केल्याचा दावा करणारे प्रशासन तोंडघशी पडले की काय असे चित्र असून या सर्व बदल्यांची चौकशी विभागीय आयुक्तांनी करावी असा सुर आता दबक्या आवाजात येऊ लागला आहे.त्यातच सांख्यिकी विस्तार अधिकारी पदाच्या बदल्यामध्ये झालेल्या अन्यायाबद्दल तिर्थराज उके यांनी विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केल्याने पारदर्शकतेचा बुरखा फाडला गेला आहे.

दर ५ वर्षानी विभाग बदल्याची प्रकिया होते,त्यानुसार जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात ५ वर्षापासून एकाच जागेवर असून मुख्य कार्यकारी अधिकारी हे किती पारदर्शकपणे ५ वर्ष झालेल्यांना हलवितात याकडे लक्ष लागले आहे.

बदल्या करतांना नियमांना बगल दिले जात असल्याचे दिसून येत असून पती पत्नी एकत्रीकरणाच्या नियमातही सामान्य प्रशासन मनमानी करतांना दिसून येत आहे.तर दुसरीकडे आपल्याच कार्यालयात गेल्या अनेक वर्षापासून ठाण मांडलेल्यांची बदली करण्याचे धाडस न दाखवता त्या कर्मचाऱ्यामुळे जिल्हा परिषदेचा सामान्य प्रशासनच चालू शकत नाही असे समजून इतरावंर अन्याय करण्याचे काम होत असल्याचे चित्र आहे.

जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी कर्मचारी हे आपल्या सोयीनुसार नियम तयार करुन अनधिकृत प्रतिनियुक्त्या करीत आहेत.त्यातच नुकत्याच झालेल्या बदली प्रकियेत एका महिला कर्मचारीवर सुध्दा अन्याय करण्यात आल्याचे दिसून आले.विशेष म्हणजे या विभागात कर्मचारी बदलीची फाईल हाताळणारा संदिप इनवाते हा कर्मचारी स्वतःगेल्या १० वर्षापासून सामान्य प्रशासन विभागातच ठाण मांडून बसलेल्या या कर्मचार्याची विभाग बदली मुख्य कार्यकारी करतात काय,याकडे लक्ष लागले आहे.जणूकाही त्या कर्मचार्याशिवाय तो विभागच काम करु शकत नाही अशी धारणा या विभागातील अधिक्षक,सहा.प्रशासन अधिकारी व वरिष्ठांनी करुन टाकली की काय असे म्हणायची वेळ आलेली आहे.



विशेष म्हणजे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगांनाथम यांची ओळख पारदर्शक म्हणून आहे.परंतु त्यांच्याच कार्यकाळात बदल्या व प्रतिनियुक्त्यामध्ये घोळ होत असल्याचे दिसून येत आहे.

८-१० वर्ष एकाच कार्यालयात ठाण मांडून बसणार्यांना त्या विभागातून हलविण्याऐवजी तिथेच ठेवायचे किंवा इतर विभागात बदलीचे आदेश काढून पुन्हा प्रतिनियुक्तीने आणायचे हा कार्यक्रम या जिल्हा परिषदेत राबविला जात असल्याने अनेक कर्मचारी न्यायापासून वंचित राहू लागले आहेत.

पती पत्नी एकत्रीकरणांतर्गत ३० किमीच्या आत दोघांनाही ठेवावे असा नियम असताना एका महिला कर्मचारीला सामान्य प्रशासन विभागातील एका कर्मचाऱ्याकरीता सालेकसा येथे पाठविण्यात आल्याचे वृत्त आहे.

### विभागीय आयुक्तांकडे अपील

सामान्य प्रशासन विभागाने २०२२ पासून विस्तार अधिकारी (सांख्यिकी) संवर्गाची नियमबाह्य बदली प्रक्रिया राबविली आहे. त्यांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे तीर्थराज उके यांच्यावर अन्याय होऊन ते पात्र असलेले व त्यांनी मागणी केलेले पंचायत समिती, गोरेगाव हे बदलीचे ठिकाण त्यांना मिळू शकले नाही. त्यामुळे न्यायासाठी त्यांनी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे अपील अर्ज ३० मे रोजी दाखल केले आहे, अशी सूत्रांकडून माहिती प्राप्त आहे.

# पालिकेच्या परिसरातच अस्वच्छेतचा कळस:सांडपाण्याच्या नाल्या तुंबल्या



**गोंदिया:–** स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत लाखो रुपये खर्च करुन सुध्दा गोंदिया नगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे.त्यातच ज्या परिसरात नगरपालिकेची प्रशासकीय इमारत आहे,त्याच इमारत परिसरातील सांडपाणी वाहून नेणार्या नाल्याच तुंबलेल्या आहेत.तर शौचालयाच्या परिसरातच केरकचरा फेकल्याचे चित्र बघावयास मिळते.पालिकेच्या कार्यालय परिसरातच सर्वत्र घाणीचे साम्राज्य असताना प्रशासनाकडून जनतेने शहरातील स्वच्छतेची अपेक्षा करणेच चुकीचे म्हणायची वेळ आली आहे.त्यातच गोंदियातील बाजार परिसर असो की, गणेशनगर, सिव्हील ईन, शिवनगर, कन्हारटोली, रामनगर, गड्डाटोली भागातील नाल्या सांडपाण्याने तुंबलेल्या आहेत.



शहरात सध्या सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. रस्त्यावरच कचर्‍याचे ढिगारे दिसतात. यामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असून, त्यांच्या आरोग्यासही धोका निर्माण झाला आहे. साचलेल्या या कचर्‍यामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. तक्रारी करूनही नगर पालिका लक्ष देत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. रेल्वेस्टेशन मार्ग, मुख्याधिकारी यांच्या निवासस्थानाकडे जाणार्या कन्हारटोलीतील मुख्य रस्ता,भाजी मार्केट, शहर पोलीस स्टेशनसह शहरातील विविध भागामध्ये कचर्‍याचे ढीग लागल्याचे दिसत आहेत.

कचर्‍यामुळे रस्त्यावर बेकायदा डम्पिंग यार्ड बनले आहे. शहरात ठिकठिकाणी घाण पसरली आहे. स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाल्याने परिसराची दुरवस्था होत आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. गजानन कॉलनी,पंचायत समिती कॉलनी, लक्ष्मीनगरात गेल्या काही दिवसांपासून कचर्‍यांचे ढीग साचले आहेत.चौकाचौकात लोक कचरा टाकतात. कचरा वेळीच उचलला जात नाही. परिणामी तो कुजतो. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.



## ३११ शिक्षकांना नियमबाह्य वेतनश्रेणीचा मुद्दा तक्रार निवारण समितीत गाजला

**गोंदिया :–** जिल्हा परिषदेत सन २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या कार्यशाळेत अतिरिक्त ठरणाऱ्या जिल्ह्यातील ३११ विषय शिक्षकांचे समायोजन करून त्यांना नियमबाह्य वेतनश्रेणी देण्यात आली. त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांच्या निधीचा अपव्यय होत आहे. या विषयावर जिल्हा परिषदेत घेण्यात आलेल्या शिक्षकांच्या तक्रार निवारण सभेत हा मुद्दा चांगलाच गाजला.

गोंदिया जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांची ४६५ पदे अतिरिक्त ठरत असल्याने विषय शिक्षकांच्या ४९१ रिक्त पदावर समायोजन करण्यासाठी १९ मे २०१६ रोजी तत्कालीन शिक्षणाधिकारी उल्हास नरड यांनी १२ मे २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यशाळा घेतली. यावेळी केवळ समायोजन प्रक्रिया असून कोणतीही वेतनवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केले होते.

### सखोल चौकशी करून कारवाईची मागणी

**यावेळी आ. आडबाले यांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करून तत्कालीन शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह संबंधित शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी एम मुरुगानंथम यांनी याप्रकरणी स्वतः चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले.**

असे असताना जि. प.तर्फे १०३० शिक्षकांची सेवाज्येष्ठता



यादी तयार केली गेली. यावर काही शिक्षकांनी सेवाज्येष्ठतेच्या घेत निकषांचे उल्लंघन झाल्याचा आरोप केला. तरीदेखील १८ ऑगस्ट २०२१ रोजी तत्कालीन मुकाअ यांनी ३११ शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याचे नियमबाह्य आदेश दिले.

जिल्हा परिषद गोंदिया या निर्णयाविरुद्ध नरेश चौरे आणि इतर शिक्षकांनी विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केली. यावर सुनावणीदरम्यान विभागीय आयुक्तांनी २८ मार्च २०२५ रोजी पत्र काढून सदर कार्यशाळा व १८ ऑगस्ट २०२१ रोजीचा वेतनश्रेणी आदेश रद्द करून नव्याने सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याचे निर्देश दिले. मात्र, दोन महिन्यांचा कालावधी लोटूनही जिपच्या शिक्षण विभागाकडून यावर कुठलीच कारवाई करण्यात आली नाही.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित तक्रार निवारण सभेत घेत शिक्षक आ. सुधाकर आडबाले यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र, शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यावर अनुत्तरित झाले.

## पायल चौधरीची फॉरेन्सिक विभागाच्या सहायक वैज्ञानिक पदी निवड

**गोंदिया:** – स्थानीय शास्त्री वॉर्ड येथील रहिवाशी असलेले मुख्याध्यापक त्रिलोक चौधरी ( मुळगाव –मुरपार/राम. ता.–सडक अर्जुनी) यांची मुलगी पायल त्रिलोक चौधरी हीची स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून फॉरेन्सिक विभागाच्या सहाय्यक वैज्ञानिकपदी निवड झाली आहे.

पायल ही सध्या गोरेगाव तालुक्यातील सटवा येथे मागिल अडीच वर्षांपासून डाक विभागात पोस्ट मास्टर म्हणून कार्यरत होती. विशेष म्हणजे वडील ही त्याच गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. सदर पदाला प्रामाणिकपणे न्याय देऊन डाक विभागाचे कार्य अत्यंत चोखपणे बजावत असताना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पायलने या पदाला गवसणी घातली.



पायलचे शिक्षण एम.एससी. व संगीत विशारद पर्यंत झालेले आहे. नोकरी करत असतांनी निरंतर अभ्यास करून कुठेही कोचिंग न लावता जीज्ञासापूर्वक स्वयंप्रेरणेने स्पर्धा परीक्षा देत डी.एफ.एस.एल. गृह विभाग अंतर्गत स्पर्धा परीक्षेत यशाचे शिखर गाठून आज सहायक वैज्ञानिक (Scientific Assistant) या पदावर निवड झाल्याने सर्वत्र तिचे कौतुक करण्यात येत आहे. तिच्या या यशाबद्दल शास्त्री वॉर्ड पोवार समाज संघटनासह इतर पदाधिकारी व नागरिकांनी पायल चौधरीचे अभिनंदन केले आहे.

## टाकाऊ कचर्‍यापासून सुद्धा नगर परिषदेला मिळते उत्पन्न



**नगर परिषद तिरोडा अंतर्गत शहरातील संपूर्ण वार्डातील घरातील ओला व सुका कचरा घंटागाडी च्या माध्यमातून नियमितपणे संकलीत करून नपच्या भिवापूर येथील डंपिंग यार्ड मध्ये विल्हेवाट लावली जाते,नाली साफसफाई व रोड साफसफाई कडे आरोग्य विभाग लक्ष देत असतो, कोणत्याही वार्डातून स्वच्छतेसाठी भ्रमणध्वनी वरुन सुचना मिळाल्यास तात्काळ कारवाई केली जाते, यामध्ये मला व माझ्या विभागातील कर्मचार्यांना देशसेवा करीत असल्याचा आनंद होतो.**

**मनोज लारोकर,मुकादम आरोग्य विभाग नगर परिषद तिरोडा**

**आम्ही शहरातील कचरा आपल्या गाडीतून सुमधुर संगीताच्या स्वरात डंपिंग यार्ड मध्ये घेऊन जातो याचा आम्हाला खुपच आनंद होतो.**

**प्रशांत गुणेरीया कायजन घंटा गाडी चालक**

**चित्रा कापसे**

**तिरोडा:–** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नगर परिषद तिरोडा येथील ओझोन घंटागाडी सुमधुर संगिताच्या ध्वनित सकाळ सकाळी नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या वार्डावार्डात फिरत असते व घरोघरी दारासमोर थांबवून सुका कचरा व ओला कचरा संकलन करीत असते.

ओझोन घंटागाडी च्या निळ्या रंगाच्या डब्यात सुका कचरा तर हिरव्या रंगाच्या डब्यात ओला कचरा जमा केला जातो, त्यानंतर हा संपूर्ण कचरा डंपिंग यार्ड भिवापूर येथे एकत्र केला जातो,ओला कचरा जमा करण्यासाठी सहा टाक्या तयार करण्यात आलेल्या असून त्या कचर्यापासून गांडूळ खताची निर्मिती केली जाते, तो गांडूळ खत नगर परिषद हद्दीतील शहरातील विविध भागात वृक्षारोपण केलेल्या झाडांना व गार्डन मधील झाडांच्या उपयोगात ऊत्तम खत झाडाच्या संवर्धनासाठी व वृक्ष वाढीसाठी केला जातो,या वापरातून शिल्लक राहीलेल्या गांडूळ खत २ रुपये किलो प्रमाणे विक्रीसुद्धा केली जाते,वाळलेला कचरा सात बॅरीगेट मध्ये गोळा केला जातो त्यामध्ये प्लास्टिक, काच, चमडा, कागदं अशा विविध टाकाऊ पदार्थांना वेगवेगळे करून बाहेरच्या कंपनीत पाठविले जाते,त्यापासून सुद्धा दरमहा सरासरी ५ हजार रुपये च्या आसपास नगर परिषदेला भांडवल मिळत असते.

नगर परिषद तिरोडा येथे आरोग्य विभागाकडे ५ रिक्षा घंटागाडी,४ कायजन (ओझोन घंटागाडी),२ ट्रॅक्टर स्वच्छतेसाठी उपलब्ध असून याद्वारे शहरातील सर्व वार्डातील घराघरातील कचरा जमा करणे,नाली साफसफाई, रोड साफसफाई या सर्व कचर्याची नियमितपणे विल्हेवाट लावली जाते, अशाप्रकारे नगर परिषद तिरोडा येथील आरोग्य विभाग अत्यंत गंभीरतेने आपले कार्य करीत असते, या कामगीरीवर शहरवासीयांना समाधान असल्याचे बोलले जाते.

स्वच्छतेसाठी नियमितपणे ब्लिचींग पावडर, नाली साफसफाई झाल्यावर मलेरीया आईल, पावसाळा लागण्यापूर्वी फॉगींग मशिन द्वारे मच्छर मारण्यासाठी फवारणी सकाळ संध्याकाळ दोन दोन तास तिरोडा नगर परिषद क्षेत्रात होते ,सुमधुर संगिताच्या ध्वनित कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडीची वाट नागरिक मोठ्या उत्सुकतेने बघत असतात हे विशेष.



# जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी मान्सूनपूर्व तयारीचा घेतला आढावा

**गोंदिया:–** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सूनपूर्व तयारीसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना देऊन मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभा कक्षामध्ये आयोजित बैठकीला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपविभागीय अधिकारी चंद्रकांत खंडाईत, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, अप्पर तहसिलदार श्रीकांत कांबळे तहसीलदार समशेर पठाण, तहसिलदार मोनिका कांबळे, तहसीलदार प्रज्ञा भाकरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांची उपस्थिती होती.



आपत्ती व्यवस्थापन कार्यकाळामध्ये जिल्हा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावा, जेणेकरून कोणतीही आपत्तीजन्य परिस्थिती उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देता येईल. बैठकीत आपत्ती व्यवस्थापनासाठी वापरली जाणारी साधने आणि यंत्रणा अद्ययावत ठेवण्यावर भर देण्यात यावा. विशेषतः बोट, लाईफ जॅकेट्स, जीपीएस यंत्रणा, सॅटेलाईट फोन, रिमोट कंट्रोल बोट यांची तपासणी करून त्यांची कार्यक्षमता सुनिश्चित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

श्री. नायर यांनी सांगितले की, आपत्ती कोणतीही पूर्वसूचना न देता येते. म्हणूनच आपण सज्ज राहणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करावे. तहसिलदार, तलाठी व इतर प्रशासन यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करण्याचे आदेश दिले, जेणेकरून गावपातळीवरही बचावकार्य आणि मदत जलद गतीने पोहोचेल.

संबंधीत यंत्रणांनी धोकादायक ठरू शकणाऱ्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्याचा अहवाल तात्काळ सादर करावा. गोंदिया जिल्ह्यातील ९६ गावे ही पूर प्रणव क्षेत्रामध्ये येतात यामुळे या ठिकाणी असणारे पूल, धरण, नाले यावर दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या.

बैठकीस संबंधित विभागाचे अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रतिनिधी, पोलीस, आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# नगर परिषदेच्या शाळांना अखेरची घरघर




## चार शाळा बंद, एक बंद होण्याच्या मार्गावर

### वर्ग चार व विद्यार्थी पाच

**नगर परिषद शाळांमध्ये गरजू विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशात विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे आवश्यक आहे. नगर परिषदेच्या वतीने कोट्यावधी रूपये खर्च शाळांच्या प्रशस्त इमारती तयार केल्यात. परंतु, भौतिक सोयी सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार, या दृष्टीकोनातून विचार करण्यात आला नाही. यामुळे नगर परिषदेच्या शाळा अखेरची घटका मोजत आहेत. त्यातही सुभाष शाळा, सिव्हील लाईन येथील शाळा, टाऊन शाळा, माताटोली नगर परिषद शाळा बंद करण्याची नामुष्की नगर परिषदेवर आली आहे. तर रामनगर येथील संत गाडगेबाबा प्राथमिक शाळा सुरू असून या शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यतचे वर्ग आहेत. परंतु, या चार वर्गात पाच विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामुळे शाळेची पटसंख्या फक्त ५ विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित आहे का? असा प्रश्न निर्माण केला जात आहे. त्यामुळे आगामी काळात ही शाळाही बंद होणार, असे चिन्ह दिसून येत आहेत.**

**गोंदिया :–** नगर परिषदेच्या वतीने शहरात जवळपास १८ शाळांचा संचालन केले जाते. या शाळांमध्ये गरीब व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, यासाठी नगरपरिषदेकडून लाखो रूपये खर्च केले जातात. परंतु, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव व नगर परिषदेच्या शिक्षण विभागाचे होत असलेले दुर्लक्षाने नगर परिषदेच्या शाळा अखेरची घटका मोजत आहेत. आजघडीला ४ शाळा पूर्णतः बंद झाल्या असून एक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. या परिस्थितीतूनही नगर परिषदेचा शिक्षण विभाग बोध घेणार का? याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

नगर परिषदेच्या वतीने शहरात १८ शाळा कार्यरत आहेत. या शाळांवर नगर परिषदेच्या शिक्षण विभागाकडून लाखो रूपये खर्च केले जातात. परंतु, खालावत शैक्षणिक दर्जा आणि पालकांचा निरुत्साहामुळे नगर परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अभाव दिसून येतो. पटसंख्येला लागलेली गळती भरून काढण्यासाठी नगर परिषदेकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होताना दिसून येत नाही. यामुळे दिवसेंदिवस नगर परिषदेच्या शाळांच्या भवितव्यावर चिंता निर्माण होत होती. अशातच कमी पटसंख्येअभावी चार शाळा बंद पूर्णतः होवून कुलूप लावण्याची वेळ आली आहे. तर एक शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे, यामुळे आगामी काळात नगर परिषदेच्या शाळा इतिहास जमा होतील, असेच दिसून येत आहे. परिणामी नगर परिषद याकडे लक्ष देवून विद्यार्थी पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीकोनातून पाऊल उचलणार का? याकडे शहर वासीयाचे लक्ष लागले आहे.

# राखीव जंगलात चक्क सिमेंट रस्त्यांचे बांधकाम



## वनविभागाची दुहेरी वागणूक

**या मार्गावरील गोसाई कोकणा ते सालई टी–पाईट भिवखिडकी टी–पाईट नवेगावबांध जाणारा मार्ग याच राखीव जंगलात असून सन २०२१–२२ मध्ये रोडाचे काम सुरू करून जवळपास ८–९ मीटर सिमेंट रोडाचे काम सुरू असतांनी नवेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी दोनोडे व बीट गार्ड, क्षेत्र सहायक यांनी रोडाचे काम करणाऱ्या कंत्राटदार मुन्ना देशपांडे यांच्यावर वनविभाग अंतर्गत वन गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन काम कामबंद केले असता कंत्राटदारांनी रोडाचे बांधकाम करण्यासाठी आणलेले साहित्य रेती, गिट्टी उचलून नेली. खोबा, चिंगी, गोसाई कोकणा, सालई, नवेगावबांध या १३ कि.मी. मध्ये चिंगी, सालई ते नवेगावबांध राखीव जंगल असल्याने आजही त्या ६ कि.मी. रस्त्याचे बांधकाम बंद पडले आहे**

**सडक अर्जुनी:–** तालुक्यातील सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगावच्या गावच्या सीमेवर असलेल्या गोसाई कोकणा ते चिंगी खंडोबा या ५ कि.मी. नवीन बनविणाऱ्या मार्गावर मागील ३–४ महिन्यांपासून सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. राखीव जंगलांत बांधकामास मनाई असताना हे बांधकाम कोणत्या नियमाखाली करण्यात येत आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

खोबा ते वांगी टी–पाईट ते चिंगी–गोसाई कोकणा या ५ कि.मी. खडीकरण असलेल्या रोडावर सिमेंट रोडाचे बांधकाम सुरू असून गोसाई कोकणा ते चिंगी हा एक कि.मी. रोड वनपरिक्षेत्र नवेगावबांध सह वनक्षेत्र नवेगावबांध बीट चिंगी कक्ष क्रमांक १९० राखीव वनातील जंगलामधून सिमेंट रोडाचे बांधकाम सुरू आहे. कंत्राटदाराने रोडाचे कडेला नाली बांधकामासाठी कित्येक झाडे मुळासकट उपटून टाकली आहेत. या रस्त्याच्या कामावर लागणारा मुरूम कक्ष क्रमांक १९० राखीव वनांच्या जंगलामधून गोसाई कोकणाच्या पश्चिम दिशेला तलाव लगत दक्षिण दिशेला शेकडो ब्रास मुरूम काढून रस्त्याचे बांधकामात वापरण्यात आला आहे. सुरुवातीला रोडाचे काम सुरू करताच बीट गार्ड यांनी एका महिन्यापर्यंत रस्त्याचे काम राखीव जंगलात असल्याने काम बंद करण्यात आले. पण तेच काम वनविभागासोबत कंत्राटदाराचे आर्थिक देवाणघेवाण झाल्यानंतर पूर्ववत सुरू झाले. अशी नागरिकांत चर्चा आहे.

# डास नियंत्रणासाठी शहरात फवारणी करा

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष : मुख्याधिकाऱ्यांना दिले मागण्यांचे निवेदन



**गोंदिया :–** शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून आजारांच्या भीतीने नागरिक दहशतीत आहेत. अशात डास नियंत्रणासाठी शहरात फवारणी करा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात आली असून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

पावसाळा तोंडावर आला असून मागील कित्येक दिवसांपासून बरसत असलेल्या अवकाळी पावसाचे पाणी जागोजागी साचून त्यात डासांची उत्पत्ती होत आहे. परिणामी शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विशेष म्हणजे, डासांमुळे मलेरिया, डेंग्यू व चिकुनगुनियाचेही रुग्ण आढळल्याने शहरवासीयांत दहशतीचे वातावरण आहे. अशात डास नियंत्रणासाठी नगर परिषदेने शहरात फवारणी करावी यासह अन्य मागण्यांसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मुख्याधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना निवेदन दिले.

नानू मुदलियार यांच्या नेतृत्वात निवेदन देताना निशिकांत बंसोड, खालिद पठाण, राजेश दवे, विनायक शर्मा, राजेश वर्मा, राज शुक्ला, सचिन अवस्थी, प्रशांत सोनपुरे, अमन घोडीचोर अमित अवस्थी, संदेश चौरे, प्रमोद उके, राकेश वर्मा, तुषार उके, भूषण पाटील प्रकाश वैद्य, रुपेश नशीने, पाशा शेख अनिल मेश्राम यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# इलेक्ट्रिक खांबावरील ॲल्युमिनियम तारांची चोरी करणारी टोळी जेरबंद



**गोंदिया :–** रावणावाडी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या मुरपार येथील विद्युत खांबावर लावण्यात आलेले इलेक्ट्रिक कंडक्टर व ॲल्युमिनियम तार चोरी करणाऱ्या टोळीच्या सदस्यांना गोंदिया स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले. ही कारवाई २८ मे रोजी करण्यात आली. प्रमोद परसराम मेहर (३४) रा. कालीमाटी, रामा दासीराम मेश्राम (२३), राजू भागू मेश्राम (३१), अंकुश जगू मेश्राम (२५) व महेंद्र लखन कांबळे (१९) सर्व रा. बोदा, ता. आमगाव, जि. गोंदिया असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

सुमितसिंग प्रितपालसिंग बग्गा (३७) रा. गणेशनगर गोंदिया यांनी पोलिस ठाणे रावणवाडी येथे यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. त्यात गोंडीटोला ते हर्षवर्धन चौक मुरपार दरम्यान ६ इलेक्ट्रिक खांबावर लावण्यात आलेले इलेक्ट्रिक कंडक्टर तार किंमत १ लाख ४० हजार रुपयांचे १९ एप्रिल ते २० एप्रिलच्या चोरट्यानी चोरून नेले होते.या प्रकरणात रावणवाडी पोलिसांनी अज्ञात आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये यांनी गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांच्या नेतृत्वात पोलिस पथक सहायक पोलिस निरीक्षक धीरज राजूरकर, पोलिस हवालदार विठ्ठल ठाकरे, प्रकाश गायधने, दुर्गेश तिवारी, इंद्रजित बिसेन, सुबोध बिसेन, हंसराज भंडारकर, घनश्याम कुंभलवार, राम खंदारे यांनी केली आहे.गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींजवळून ॲल्युमिनियम कंडक्टर ताराचे तीन मोठे बंडल किंमत ४ लाख ५० हजार रुपये व इलेक्ट्रिक खांबास लावण्यात येणारे अर्थिंग वायर, कब्जे, चॅनेल एक्सटेन्शन वायर अंदाजे किंमत २५ हजार असा एकूण किंमत ४ लाख ७५ रुपयांचा माल हस्तगत करून गुन्ह्यात जप्त करण्यात आला.

# जनतेच्या समस्यांना घेवून प्रहारचे अन्नत्याग आंदोलन १० जूनपासून

**तिरोडा :–** शेतकरी, दिव्यांग, भूमिहीन मजूर, माविममधील महिला कर्मचारी, योग शिक्षक यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने १० जूनपासून नवेझरी येथील स्मशानभूमी (मोक्षधाम) येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर करणार आहेत.

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन देण्यात यावे, भूमिहीन मजुरांसाठी पाच लाख रुपये अपघाती विमा सुरक्षा कवच जाहीर करावा, पेरणी ते कापणी पर्यंतची शेतीची कामे नरेगा योजनेअंतर्गत करण्यात यावीत, सीतेपार व कोयलारी आश्रमशाळेतील अपघातांची सखोल चौकशी करून पीडित कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत करावी, राखेची वाहतूक करणारे ट्रक, टिप्परांवर कार्यवाही करावी, माविममध्ये काम करणाऱ्या महिला सीआरपी व लेखापालांचे मानधन वाढवावे, जिल्हा परिषद योग शिक्षकांचे मानधन, निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा, खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल, ट्रॅक्टर भाडे, मजुरी यांचे दर वाढले असताना शेतीमालाचे दर मात्र का वाढले नाहीत, याचे उत्तर सरकारने द्यावे, शेतमाल उत्पादन खर्चावर किमान २० टक्के नफा धरून भाव जाहीर करावा, स्वामीनाथन आयोगाची शिफारस तत्काळ लागू करावी, यासह अन्य मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनात दिव्यांग, भूमिहीन मजूर, माविममधील महिला कर्मचारी, योग शिक्षक यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर यांनी केले आहे.

# अवयव दान करून प्राथमिक शिक्षकांनी समाजासमोर उभा केला आदर्श



## शिक्षक सहकारी पतसंस्था गोंदियाचा आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त उपक्रम

**गोंदिया:–**आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून गोंदिया जिल्हा प्राथमिक सहकारी पतसंस्था मर्यादित १ द्वारे भव्य रक्तदान शिबिर व अवयव दान शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळेस जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल वीस शिक्षकांनी अवयव दान प्रक्रियेत सहभाग घेऊन अधिकृत नोंदणी केली. यामुळे प्राथमिक शिक्षकांची सामाजिक बांधिलकी समाजाला बघावयास मिळाली.

समाजाचा घटक म्हणून काम करत असताना समाजातील दुर्लक्षित उपेक्षित व अंध– अपंग लोकांना न्याय देण्यासाठी प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेने पुढाकार घेत आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून भव्य अवयवदान शिबिर शिक्षक पतसंस्था गोंदिया येथे आयोजित केले . यावेळी संदीप तिडके, किशोर डोंगरवार,अनिल वट्टी,धर्मेंद्र बोरकर, विवेक बिसेन, राजेश रामटेके, राजेंद्र कुमार कडव, हरिराम येरणे, ओमप्रकाश मस्के, सत्यनारायण दमाहे, शोभेलाल ठाकूर, अशोक कुमार बिसेन, तुळशीराम शहारे, पुरुषोत्तम नेवारे,मंगेश मेश्राम, उमंग डोंगरवार, स्नेहा रामटेके,कृपाल रहांगडाले, पंकज रहांगडाले, कु. नीतू डहाट यांनी अवयव दान प्रक्रियेत सहभाग नोंदवून अधिकृत नोंदणी केली. याद्वारे समाजातील अंध लोकांना नव्याने दृष्टी प्राप्त होणार आहे. ज्यांचे यकृत काम करत नाही, अशांना यकृत इच्छुक दानदात्यांच्या मरणोउप्रांत प्राप्त होणार आहे. समाजासमोर आदर्श निर्माण करण्याचे काम प्राथमिक शिक्षक बांधवांनी या शिबिराच्या माध्यमातून केले आहे यावेळी जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम मुरुगानंथम यांनी भेट देऊन अवयव दानदात्यांचे कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर डोंगरवार, उपाध्यक्ष अशोक बिसेन, संदीप तिडके,गौतम बांते, विनोद बडोले, शोभेलाल ठाकूर,दिलीप लोदी, राजेंद्र बोपचे,उमेश रहांगडाले, सतीश दमाहे, राजेश रामटेके, सौ.भारती तिडके, कुमारी नीतू डहाट, व्यवस्थापक ज्योतीप्रकाश गजभिये यासह पतसंस्थेमधील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अतिक्रमण प्रकरणावरून खांबीचे सरपंच ठरले अपात्र

**अर्जुनी–मोरगाव:** – तालुक्यातील ग्राम खांबी येथील ग्रामपंचायत सरपंच निरूपा जितेंद्र बोरकर यांना अतिक्रमण प्रकरणावरून सरपंचपद धारण करण्यास अपात्र ठरविण्यात आल्याचा आदेश ३० मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी पारित केला.




सरपंच निरूपा बोरकर त्यांच्या पतीने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून पक्के घर तयार केले आहे. ग्रामपंचायत सरपंच निरूपा बोरकर या आपल्या पतीसोबत शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून तयार केलेल्या घरात एकत्र राहतात. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १४ (१) (ज–३) नुसार ग्रामपंचायत खांबीचे सरपंचपद धारण करण्यास अपात्र ठरविण्यात यावे, अशी मागणी गावातील सुदाम बाबूराव खोटेले व तुलाराम मुरलीधर खोटेले यांनी जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात केली होती. जिल्हाधिकारी न्यायालयात अर्जदारांच्या वतीने ॲड. गौरीशंकर अवचट्टे, तर गैरअर्जदार सरपंच निरूपा बोरकर यांच्या वतीने ॲड. आर. एन. नागासे यांनी कायदेशीर बाजू मांडली. दोघांचा युक्तिवाद तसेच तलाठी व सचिवांच्या अहवालावरून जिल्हाधिकाऱ्यांनी ३० मे रोजी आदेश पारित करून सरपंच निरूपा बोरकर यांना सरपंचपद धारण करण्यास अपात्र ठरविले. पहिल्या प्रथमच सरपंच झालेल्या महिला निरूपा बोरकर यांना अतिक्रमण प्रकरण भोवले असून, त्यांना सरपंच पदासाठी अपात्र ठरविण्यात आले.

# पवार प्रगतिशील मंचची कार्यकारिणी गठीत,अध्यक्षपदी उकराम बिसेन



**गोंदिया :–** स्थानिक पवार प्रगतिशील मंचची निवडणूक १८ मे रोजी पार पडली. १५ संचालकांसाठी झालेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे १२ तर प्रगती विकास पॅनलचे ३ संचालक निवडणूक आले होते. आज ३१ मे रोजी स्थानिक पोवार बोर्डिंग येथे समाजाचे वरिष्ठ झामसिंग बघेले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेत कार्यकारिणी गठीत करण्यात आली. कार्यकारणीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते उकराम बिसेन यांची निवड करण्यात आली.

आज पार पडलेल्या सभेच्या नवनियुक्ती कार्यकारिणीचे गठण करण्यात आले. अध्यक्षपदी उकराम बिसेन, उपाध्यक्ष लिलाधर पटले, सचिव हुपेंद्र बोपचे, कोषाध्यक्ष योगेश ठाकरे, सहसचिव सौ.उर्मिला रहांगडाले, संघटन सचिव दिपक देशमुख तर प्रचार सचिवपदी ॲड. रजत ठाकुर यांची नियुक्ती करण्यात आली.नवनियुक्ती संचालकांमध्ये ॲड. पृथ्वीराज चव्हाण, ॲड. टी. बी. कटरे, ॲड. योगेश रहांगडाले, विश्वनाथ पटले, अजय रहांगडाले, सौ. उपमा गौतम, सौ. धनीषा कटरे, छनेश चव्हाण यांचा समावेश आहे. सभेचे अध्यक्ष यांनी समाज हितासाठी कार्य करण्याचे आवाहन नियुक्ती कार्यकारिणीला केले. यावेळी पुर्व अध्यक्ष संजय रहांगडाले, राजेश चव्हाण, राजु बोपचे, सुरेश पटले, प्रवीण बिसेन, राजेश बिसेन, बाबा बिसेन उपस्थित होते.सभेचे संचालन पोवार स्वर्गरथ सेवा समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद ठाकरे यांनी केले तर आभार अध्यक्ष उकराम बिसेन यांनी मानले.

# किडंगीपार गावापासून विकसित कृषि संकल्प अभियानाचा शुभारंभ




**गोंदिया :–** कृषि विकासाच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलत गोंदिया जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने किडंगीपार गावापासून विकसित कृषि संकल्प अभियानाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य विद्या पटले, सरपंच लता उईके, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी निलेश कानवडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमात कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी तसेच किडंगीपार गावातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विकसित कृषि संकल्प अभियान हा भारत सरकारचा एक महत्वूपर्ण राष्ट्रीय उपक्रम आहे. सदर उपक्रम दि.२९ मे ते १२ जून २०२५ या कालावधीत राबवला जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे गाव पातळीवर आधुनिक, वैज्ञानिक व शाश्वत कृषि पध्दतीचा प्रसार करुन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीस अधिक फायदेशीर व पर्यावरणपुरक बनवणे. कार्यक्रमात शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्य पत्रिकांचे वाटप, पीक उत्पादन वाढीसाठी सल्ला, जैविक आणि सेंद्रीय शेतीची माहिती, तसेच हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानावर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमा दरम्यान कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी विशाल उबरहंडे, गणेश खेडीकर व किशोर ठाकरे यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच केंद्रीय कापूस संशोधन केंद्र नागपूर येथील शास्त्रज्ञ डॉ.राहुले फुके यांनी बियाणे संदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य विद्या पटले यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या कार्याचे कौतुक करताना असे उपक्रम ग्रामीण भागात शेतीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतील असे मत व्यक्त केले.

सरपंच लता उईके यांनी गावातील शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन शेतीत बदल घडविण्याचे आवाहन केले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी निलेश कानवडे यांनी राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली आणि कृषि संकल्प अभियानातून गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल असे सांगितले.

या अभियानांतर्गत गावातील शेतीची सर्वांगीण माहिती संकलीत करुन गावात एक मॉडेल शेती व्यवस्था उभारण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, प्रयोगशाळा आधारित सल्ला, वाण निवड, खत व्यवस्थापन, किड व रोग नियंत्रण, पाणी व्यवस्थापन इत्यादी बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे.

हा उपक्रम शेतकऱ्यांना ज्ञान, संसाधने व शासकीय योजनांचा लाभ एकाच वेळी देणारा एक महत्वाचा टप्पा ठरणार आहे. कृषि विज्ञान केंद्र गोंदिया व ग्रामपंचायतीच्या संयुक्त प्रयत्नातून किडंगीपार हे गाव कृषि क्षेत्रात एक आदर्श गाव म्हणून उदयास येईल असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

# मनरेगा तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार यांना विविध योजनेचा लाभ घेण्याच्या सूचना

**गोंदिया:** मनरेगा अंतर्गत काम करणा–या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यात येत असून सदर कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यात येतो.

तसेच शासकीय कार्यालयातील कंत्राटदारांनी इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम– १९९६ अंतर्गत कामगार विभागाकडे नोंदणी प्रमाणपत्र घेवून त्यांच्याकडील बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात करण्याची तरतूद असून इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळात गोंदिया जिल्हयात जास्तीत जास्त नोंदणी व्हावी याकरीता शासनाच्या विविध शासकीय विभागाने समन्वयाने काम करावे तसेच शासकीय बांधकाम कंत्राटदार व संबंधित क्षेत्रात काम करणा–या कामगार संघटनेने सहकार्य करावे अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी भैयासाहेब रामराव बेहेरे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे गुरुवार दिनांक २९ मे २०२५ रोजी मनरेगा योजनेअंतर्गत काम करणा–या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या सभेत ते बोलत होते.


